आर.सी.सी. २९/२०२२
सरकार वि. अतुल उगले
**निशाणी ५०**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ५ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – किरण सुभाष साळुंके, वय – ३३ वर्षे,
व्यवसाय – पोलीस उपनिरिक्षक राहणार – लासलगाव,
तालुका – निफाड, जिल्हा – नाशिक.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. दिनांक २२.०१.२०२२ रोजी मी पोलीस स्टेशन अकोले येथे परिविक्षाधीन पोलीस उपनिरिक्षक म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस स्टेशनला कार्यरत असताना पोलीस निरिक्षक श्री. घुगे यांना गुप्त बातमीदाराद्वारे बातमी मिळाली की, डोंगरगाव शिवारात आढळा नदीपात्रात अवैधरित्या वाळु उपसा चालू आहे. त्यांनी आम्हाला आदेश दिले की, तुम्ही त्या ठिकाणी जावून पाहणी करा व काही मिळून आल्यास कारवाई करा. त्यानंतर आम्ही आमचा पोलीस स्टाफ व दोन पंचांसह सरकारी वाहनाने तेथे गेलो. सदर ठिकाणी महिंद्रा कंपनीच्या ट्रॅक्टरमध्ये वाळु भरण्याचे काम चालू होते. सदर ट्रॅक्टर भरलेला होता आम्ही त्यास थांबवून विचारणा केली तेव्हा तो पळून गेला. पळून गेलेल्या इसमाचे नाव अतुल बाबासाहेब उगले असे होते. सदर ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास वाळु होती. सदर ट्रॅक्टरचा नोंदणी क्रमांक बी.एक्स ४६७४ असा होता. पंचनामा करताना नंबर स्पष्ट नसल्यामुळे तो बी.वाय ७४२० असा झाला होता. कागदपत्र पाहिल्यानंतर तो एम.एच १७ बी.एक्स ४६७४ असा असल्याचे निष्पन्न झाले.

२. तेथे आजुबाजूला लोकांकडे चौकशी केली असता आरोपीचे नाव निष्पन्न झाले. ट्रॅक्टर ट्रॉली व वाळुसह जप्त करून दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. आता मला अभिलेखावरील सदरचा पंचनामा दाखवण्यात

आला. त्यावर माझी व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५१** देण्यात येते. सदर गुन्ह्याच्या कामी माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर नाही. तो मला दाखवल्यास मी ओळखू शकतो.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. डी. एम. काकड यांच्या मार्फत</u>**

३. मी पंचांना लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, डोंगरगाव येथे तलाठी कार्यालय आहे. हे म्हणणे खरे नाही की, डोंगरगाव येथील आढळा नदीचे पात्र हे खडकाळ आहे. पंचनामा किती वाजता चालू झाला व किती वाजता संपला हे मी अभिलेख बघुन सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा केला हे खोटे सांगत आहे.

४. ट्रॅक्टर कोणत्या सर्व्हे नंबर मध्ये उभा होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टरला ट्रॉली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामधील नंबर बदलण्यासाठी हेतुपुरस्कर पुरवणी जबाब नोंदवला. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष वाळु भरताना पाहीली नाही. सरकारी वाहनाचा नोंदणी क्रमांक मला आठवत नाही. आम्ही अकोले येथून किती वाजता सरकारी वाहनाने गेलो याची नोंद स्टेशन डायरीला केली नव्हती.

५. गावातील तलाठी, सरपंच यांना मी खबर केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावरील पंच हे नेहमीच ते त्यांच्या चहाच्या व्यवसायानिमित्त पोलीस स्टेशनला येत असतात. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा मी पोलीस स्टेशनमध्येच तयार केला व तेथेच सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला त्रास देण्यासाठी पंचनाम्यामध्ये आरोपीच्या

ट्रॅक्टरचा नंबर टाकला. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पंचनामा करून खोटा जबाब देत आहे. आम्ही कारवाई करता गेलो होतो त्यावेळी इतर लोक जमले नव्हते.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.03 18:08:36 +0530

दिनांक ०३.०२.२०२६
अकोले.

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.